**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

आस्थापना/नस्ती-१२/२०१९-२०/२१८ एप्रिल २०, २०१९

# परिपत्रक

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाशी संचलित व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभाग यांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन संरचनेतील वेतननिश्चतीबाबत पुणे येथे दिनांक ०८.०४.२०१९ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यास अनुसरून खालील वेळापत्रकानुसार आपल्या विद्यापीठाशी संचलित व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभाग यामधील शिक्षकीय कर्मचा-यांचे वेतन निश्चितीचे काम पुर्ण करावे.

| अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | महाविद्यालयांनी/प्राचार्यांनी/विभागप्रमुखांनी वेतननिश्चिती करून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणे. | १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०१९ |
| ०२ | विद्यापीठस्तरावर महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांची तपासणी/पडताळणी करणे. | २० एप्रिल ते ३० एप्रिल २०१९ |
| ०३ | विद्यापीठाकडून वेतननिश्चिती पडताळणी झाल्यावर विभागीय सहसंचालक स्तरावर पडताळणी करणे | २५ एप्रिल २०१९ ते ३० मे २०१९ |
| ०४ | वरिष्ठ लेखा परिक्षक यांचेकडून वेनिनिश्चितीची पडताळणी करणे | ०१ मे ते ३० मे २०१९ |
| ०५ | प्रत्यक्ष वेतनाचा लाभ एचटीई सेवार्थ मधून | मे पेड इन जून २०१९ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सदर कार्यवाही कालबध्द पध्दतीने करावयाची असल्यामुळे कृपया आपण आपल्या महाविद्यालय/विभागातील शिक्षकांची ७व्या वेतनाची वेतननिश्चिती सोबत जोडलेल्या प्रपत्रक भरून घ्यावे व व्यवस्थितरित्या तपासून विद्यापीठास पाठवावे. त्याचप्रमाणे ज्या शिक्षकांना वेतन निश्चितीचा विकल्प द्यावयाचा असेल तोदेखील सोबत जोडलेल्या नमुन्यात सादर करावा. कृपया विहीत केलेल्या नमुन्यामधीलच प्रपत्र वापरावे. त्यामध्ये दुरुस्ती/ माहिती वगळणे/ अतिरिक्त माहिती भरणे इत्यादी करू नये.

आपण दिनांक ३० एप्रिल २०१९ पर्यंत सादर केलेल्या वेतन निश्चिती प्रपत्रांची विद्यापीठ स्तरावर छाननी करून सदर प्रस्ताव मा. सहसंचालक कार्यालयास मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने आपण आपले प्रस्ताव विहीत केलेल्या मुदतीत दिनांक ३० एप्रिल २०१९ पर्यंत प्राधान्य क्रमाने विद्यापीठास पाठवावेत हि विनंती.

महाविद्यालयांकडून माहिती मागविण्यासाठी जरी ३० एप्रिल २०१९ ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. तरीही अंतिम दिनांकाची वाट न पाहता तातडीने उपरोक्त कार्यवाही करावी ही विनंती.

(डॉ. दिपक देशपांडे)
कुलसचिव

प्रत रवाना :-
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाशी संचलित व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभाग, संबंधित संस्थांचे अध्यक्ष/सचिव/विभाग प्रमुख यांच्या माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.